पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३१ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । शनिवार ०३/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# कोल्हार-घोटी मार्गावर धुळीचे साम्राज्य

## समनापूर-वडगावपान परिसरातील नागरिकांचा जीव धोक्यात!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कोल्हार-घोटी राज्य मार्गाच्या रखडलेल्या कामामुळे तालुक्यातील समनापूर आणि वडगाव पान परिसरात धुळीचे अक्षरशः साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्यावरून अवजड व वेगवान वाहने धावताच धुळीचे लोट हवेत उडत असून, काही ठिकाणी रस्त्यावर जणू धुक्याची चादर पसरल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणारे दुचाकीस्वार, पादचारी, स्थानिक नागरिक तसेच रस्त्यालगतचे व्यावसायिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

### 'संगमनेरहून निघालेला माणूस वडगावपानपर्यंत काळाठिक्कर !'

संगमनेरहून वडगाव पानकडे जाणारा अवघा आठ-दहा किलोमीटरचा प्रवासही सध्या नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. संगमनेरहून निघालेला माणूस वडगाव पानपर्यंत पोहोचेपर्यंत धुळीने काळा-निळा पडतो, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. सतत हवेत उडणाऱ्या धुळीमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दुचाकीस्वारांना घशात खवखव, खोकला, डोळ्यांची जळजळ आणि श्वसनाशी संबंधित त्रास जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. धुळीच्या सततच्या संपर्कामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

रस्त्याच्या कामासाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे मोठ्या प्रमाणात माती रस्त्यावर आली आहे. त्यातच रस्त्यावर टाकण्यात येणाऱ्या खडी व मुरुमामध्ये मातीचे प्रमाण अधिक असल्याने आणि दिवसभर या मार्गावरून अवजड वाहनांची मोठी वर्दळ सुरू असल्याने धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. वाहनांचा वेग वाढला की रस्त्यावरील माती हवेत उडते आणि काही क्षणांतच परिसर धुळीने व्यापून जातो. आजूबाजूच्या शेती पिकांवर देखील धूळीचे थर साचत आहे. रस्त्यालगत असलेल्या हॉटेल, चहाच्या टपऱ्या, खाद्यपदार्थांची दुकाने आणि अन्य व्यावसायिकांना या धुळीचा मोठा फटका बसला आहे. (पान २)

### पादचारी आणि दुचाकीस्वारांसाठी जीवघेणा धोका

या मार्गावरील धुळीचा सर्वाधिक फटका पायी चालणाऱ्या नागरिकांना आणि दुचाकी वाहनचालकांना बसत आहे. अचानक समोरून किंवा मागून येणाऱ्या वाहनामुळे उडणारी धूळ दुचाकीस्वारांच्या डोळ्यांत व तोंडात जात असल्याने काही क्षणांसाठी दृष्टी धूसर होण्याचा धोका निर्माण होत आहे. त्यातच धुळीच्या लोटामुळे समोरून येणारे वाहन किंवा रस्त्यावरील अडथळे स्पष्ट दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पादचाऱ्यांचीही मोठी गैरसोय होत आहे. रस्त्याच्या कडेला सुरक्षितपणे चालण्यासाठी पुरेशी जागा नसताना अवजड वाहने धावत असल्याने आणि त्यांच्या चाकांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्याने नागरिकांना धुळीतूनच मार्ग काढावा लागत आहे. रस्त्याचे काम सुरू असताना योग्य सुरक्षा उपाययोजना न झाल्यास हा मार्ग नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर आव्हान ठरू शकतो, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# रेल्वे सरळ मार्गानेच; अन्यथा जनआंदोलन

## समितीची मुदत संपत आली, तरी जनसुनावणी नाही - आ. तांबे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाचा मार्ग बदलण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. पुणे-नाशिक रेल्वे सरळ मार्गानेच झाली पाहिजे, या मागणीसाठी ९ ऑगस्ट रोजी करण्यात आलेल्या मोठ्या जनआंदोलनानंतर प्रशासनाने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे या प्रश्नावर पुन्हा एकदा तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा आमदार सत्यजित तांबे यांनी दिला आहे.

९ ऑगस्टच्या आंदोलनात दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आलेली ६० दिवसांची मुदतवाढ देऊ नये आणि समितीने केवळ तांत्रिक बाबींचा अभ्यास न करता जनसुनावणी घेऊन स्थानिक जनतेच्या भावना व मते जाणून घ्यावीत, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली होती. प्रशासनाने या दोन्ही मागण्या लेखी स्वरूपात मान्य केल्याचे तांबे यांनी सांगितले. मात्र, समितीला देण्यात आलेली ६० दिवसांची मुदत आता संपत आली असतानाही या कालावधीत समितीची केवळ एकच बैठक झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, रेल्वे मार्गाशी संबंधित नागरिक, शेतकरी, स्थानिक संस्था आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी कोणतीही जनसुनावणी अथवा व्यापक चर्चा झालेली नाही.

यामुळे जनतेमध्ये नाराजी वाढत असून, समितीच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. केवळ कागदोपत्री तांत्रिक अभ्यास करून पुणे-नाशिक रेल्वेच्या मार्गाबाबत निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. या प्रकल्पाचा थेट परिणाम संबंधित भागातील शेतकरी, नागरिक आणि भविष्यातील विकासावर होणार असल्याने जनतेचा सहभाग आणि त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, अशी भूमिका तांबे यांनी मांडली. (पान ४ वर)

# एसआयआरविरोधात विरोधकांचा एल्गार

## ज्ञानेशकुमारांच्या राजीनाम्यासाठी दिल्ली-मुंबईत आंदोलन



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसह मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेला विरोध करण्यासाठी दिल्ली आणि मुंबईत आंदोलनाची धार तीव्र झाली आहे. दिल्लीतील जंतर मंतरवर डावे पक्ष, आम आदमी पक्ष, विद्यार्थी संघटनांसह विविध घटकांनी आंदोलन सुरू केले असून, आंदोलकांची संख्या वाढत असल्याने पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

आपचे नेते सौरभ भारद्वाज जंतर मंतरवर आंदोलनस्थळी पोहोचताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, आयसा (ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन), आरजेडीचे खासदार मनोज झा आणि वकील प्रशांत भूषण यांनी नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. (पान ५)

### ठाकरे बंधूंच्या मोर्चाला इंडिया आघाडीचा पाठींबा

एसआयआर प्रक्रियेवरून निवडणूक आयोगाच्या कारभारावर विरोधकांकडून जोरदार आक्षेप घेतले जात असताना, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एकत्रित आंदोलनाची घोषणा केली आहे. रविवारी, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत हे आंदोलन होणार असून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससह इंडिया आघाडीतील काही मित्रपक्षांनीही त्याला पाठिंबा दर्शविला आहे. काही पक्ष या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होणार असल्याने मुंबईतील हे आंदोलन राजकीयदृष्ट्या लक्षवेधी ठरण्याची शक्यता आहे.

# शेतकऱ्यांच्या बांधावर आमदार खताळ; दुष्काळाची पाहणी



बळीराजा हा आपला अन्नदाता आहे. या संकटसमयी आपण बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. दुष्काळाची झळ बसलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला एकटे पडू दिले जाणार नाही महायुती सरकारच्या माध्यमातून दिवाळीपर्यंत नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या बँक खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम वर्ग होईल यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार

**आ. अमोल खताळ, संगमनेर**

युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठारभागात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आमदार अमोल खताळ यांनी आज विविध गावांचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी हिवरगाव पठार येथील सुतारवाडी, कौठे मलकापूर, कुंभारवाडी, जांभुळवाडी तसेच पिंपळगाव देपा येथे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व व्यथा जाणून घेतल्या.

पावसातील मोठा खंड, निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई आणि हाता-तोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी करपल्याने बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. या नैसर्गिक संकटाला सर्वांनी एकजुटीने सामोरे जाण्याची गरज असून, शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी यावेळी केले.

दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला जास्तीत जास्त शासकीय मदत मिळवून देण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगत आमदार खताळ यांनी कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, अशा स्पष्ट सूचना दिल्या. एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहता कामा नये, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गावपातळीवर त्याची जाहीर प्रसिद्धी करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांनी केली. (पान ४ वर)

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
१०९ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# दुष्काळाच्या झळा तीव्र जिल्ह्यात १४७ टँकरचा

अहिल्यानगर - जिल्ह्यात दुष्काळाच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होत असून ग्रामीण भागातील पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. अनेक गावांमध्ये विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोत आटल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील १३९ गावे आणि ७८५ वाड्यांमधील तब्बल २ लाख ८० हजार ३११ नागरिकांची तहान टँकरच्या पाण्यावर भागत आहे. या नागरिकांसाठी प्रशासनाने १४७ टँकर सुरू केले आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या आकडेवारीनुसार, पाणीटंचाईग्रस्त भागांना दररोज ३१२.५ मंजूर खेपांपैकी २६३ खेपांद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. टंचाईग्रस्त गावांना स्थानिक पातळीवर पाण्याचा स्रोत उपलब्ध व्हावा, यासाठी प्रशासनाने ३० विहिरी, बोअरवेल व अन्य पाणी उद्भवांचे अधिग्रहण केले आहे.

जिल्ह्यात सध्या पाथर्डी तालुक्यात पाणीटंचाईची तीव्रता सर्वाधिक असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. तालुक्यातील ५३ गावे आणि २९५ वाड्यांमधील १ लाख २० हजार ८३७ नागरिकांसाठी ६७ टँकर सुरू आहेत. या टँकरच्या माध्यमातून दररोज १३१ खेपा करून पाणीपुरवठा केला जात आहे. त्यानंतर शेवगाव तालुक्यातील २३ गावे आणि १२४ वाड्यांसाठी १९ टँकर, तर कर्जत तालुक्यातील २२ गावे आणि १५८ वाड्यांसाठी १८ टँकर सुरू आहेत. नगर तालुक्यातील १९ गावे, संगमनेरमधील ८ गावे, जामखेडमधील ५ गावे, पारनेरमधील ३ गावे, नेवाशातील २ गावे आणि श्रीगोंद्यातील ४ गावांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. दरम्यान, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी आणि राहाता या तालुक्यांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता भासलेली नसल्याचे प्रशासनाच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर जिल्हा परिषद प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत असून, संबंधित गटविकास अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार टँकरच्या खेपांचे नियोजन केले जात आहे.

# राज्यातील धरणसाठ्यात घट; मराठवाड्याची स्थिती चिंताजनक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यातील प्रमुख ३ हजार ३२ मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ अखेर सुमारे ७५.२५ टक्के म्हणजेच १,०८०.१८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी याच दिवशी हा साठा ८८.८२ टक्के म्हणजे १,२८०.१८ टीएमसी होता. त्यामुळे यंदा राज्याच्या पाणीसाठ्यात तब्बल १३.५७ टक्के म्हणजे सुमारे १९५.५९ टीएमसीने घट झाली आहे. विशेषतः मराठवाड्यातील धरणांमध्ये केवळ ४४.९२ टक्के साठा असल्याने आगामी काळातील पाणी नियोजनाचे आव्हान निर्माण झाले आहे.



ही माहिती जलसंपदा अभ्यासक व सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता इंजि. हरिश्चंद्र र. चकोर यांनी दिली. राज्यात सप्टेंबर महिन्यात पावसाने मोठी उघडीप दिल्याने उष्ण हवामानाचा परिणाम पाणीसाठ्यावर झाला. त्यामुळे राज्यातील उपयुक्त पाणीसाठ्यात अंदाजे ७.८० टीएमसीची घट झाल्याचे चकोर यांनी सांगितले. आगामी काळात परतीचा पाऊस झाल्यास काही प्रमाणात साठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे. १ ऑक्टोबरअखेर राज्यातील सहा महसुली विभागांपैकी कोकण विभागात सर्वाधिक ९१.१० टक्के, तर पुणे विभागात ८६.८९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. नाशिक विभागात ८२.४४ टक्के साठा आहे. याउलट मराठवाड्यात केवळ ४४.९२ टक्के, अमरावतीत ६३.४२ टक्के आणि नागपूर विभागात ७३.०२ टक्के साठा आहे. मराठवाड्याची स्थिती विशेष लक्षवेधी असून, या विभागात जोरदार परतीच्या पावसाची आवश्यकता असल्याचे चकोर यांनी नमूद केले.

अहिल्यानगर जिल्ह्यात शेती व पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या प्रमुख प्रकल्पांमध्ये सुमारे ४२.४९५ टीएमसी म्हणजे ७२.४४ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे ९.५६ टीएमसीने कमी आहे. उत्तर अहिल्यानगरमधील भंडारदरा, निळवंडे, मुळा व आढळा हे प्रकल्प समाधानकारक स्थितीत आहेत. मात्र दक्षिण भागातील सीना, खैरी, मांडोहोळ व घाटशीळ-पारगाव या प्रकल्पांमध्ये साठा अत्यल्प आहे. त्यामुळे या भागासाठी परतीच्या पावसाकडे अपेक्षेने पाहिले जात आहे.

जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्पांमध्ये भंडारदरा १०० टक्के, निळवंडे ८७.७० टक्के, मुळा ७९.५० टक्के, आढळा ९९.७२ टक्के, सीना ३३.२१ टक्के, खैरी १४.९० टक्के, मांडोहोळ १७.५२ टक्के, विसापूर ७१.७२ टक्के आणि पिंपळगाव खांड १०० टक्के साठ्यावर आहे. घाटशीळ-पारगावमध्ये साठा शून्य टक्के असल्याचे आकडेवारीत नमूद आहे. मराठवाडा व अहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या जायकवाडी धरणात ८७.३८७ टीएमसी म्हणजे ८५.०६ टक्के पाणीसाठा आहे. आतापर्यंत धरणात सुमारे ६६.६४३ टीएमसी नवीन पाण्याची आवक झाली असून सुमारे ५.७९० टीएमसी पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. सध्याच्या स्थितीत नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांतील धरणसमूहातून जायकवाडीसाठी पाणी सोडण्याची आवश्यकता नसल्याचे चकोर यांनी स्पष्ट केले. संगमनेर तालुक्यातील निमोण-तळेगाव दुष्काळी पट्ट्यासाठी महत्त्वाच्या भोजापूर धरणात सुमारे ९५ टक्के पाणीसाठा आहे. धरणातून तीन वेळा ओव्हरफ्लोचे पाणी कालव्याद्वारे सोडण्यात आले असून, सुमारे ७८३ दशलक्ष घनफूट पाणी लघु पाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव तसेच दगडी व काँक्रीट बंधारे भरण्यासाठी देण्यात आल्याचे चकोर यांनी सांगितले.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात निमोण-तळेगावच्या वंचित क्षेत्राचा समावेश करण्यात आल्याने या भागातील शेतकऱ्यांना भविष्यात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये सुमारे ९६.४८ टक्के म्हणजे ४८.७० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा २.६६ टक्क्यांनी कमी आहे. जुलै-ऑगस्टमध्ये झालेल्या चांगल्या पावसामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग करावा लागला. नांदूर-मधमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरीपात्रात सुमारे ५८.१०८ टीएमसी पाणी सोडण्यात आले. गंगापूर धरणात ९९.४१ टक्के, दारणा धरणात ९९.७९ टक्के आणि कडवा धरणात १०० टक्के साठा आहे. त्यामुळे नाशिक शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच सिंचनाची चिंता सध्यातरी कमी झाली आहे.

राज्यातील मोठ्या जलाशयांमध्ये उजनी धरणात ९५.७१ टक्के, तर कोयना धरणात सुमारे ९५ टक्के पाणीसाठा आहे. पुणे विभागातील कुकडी प्रकल्प समूह आणि घोड धरणातही चांगला साठा असल्याने दक्षिण अहिल्यानगरमधील सिंचन क्षेत्राला त्याचा लाभ होण्याची अपेक्षा आहे. यंदा राज्यातील पर्जन्यमानात मोठी भौगोलिक तफावत दिसून येत आहे. घाटघर येथे आतापर्यंत सुमारे ४,६१७ मिमी, तर मुळशीच्या पाणलोट क्षेत्रात सुमारे ७,३९२ मिमी पाऊस नोंदविला गेल्याचे चकोर यांनी सांगितले. याउलट अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे केवळ १५३ मिमी पाऊस नोंदविला गेला आहे.

राज्यातील काही विभागांमध्ये पाणीसाठा समाधानकारक असला तरी मराठवाडा, विदर्भातील काही भाग आणि दक्षिण अहिल्यानगरमधील स्थिती लक्षात घेता आगामी पाणी नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. परतीचा पाऊस किती पडतो, यावर अनेक भागांतील पाणीसाठ्याचे चित्र बदलू शकते.

## पान १ वरून कोल्हार-घोटी मार्गावर...

पान १ वरून

ग्राहकांसाठी ठेवलेल्या खाद्यपदार्थांवर काही वेळातच धुळीचा थर साचत असल्याने व्यावसायिकांना वारंवार स्वच्छता करावी लागत आहे. काही व्यावसायिकांना धुळीच्या त्रासामुळे व्यवसायावर परिणाम सहन करावा लागत आहे. रस्त्याचे काम होणे आवश्यक आहे; मात्र कामाच्या काळात नागरिकांचे आरोग्य आणि व्यावसायिकांचे नुकसान होणार नाही, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे.

रस्त्याच्या कामादरम्यान धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी मारणे, माती व बांधकाम साहित्याची योग्य हाताळणी करणे तसेच वाहतुकीच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे आहे. नियमित पाणी मारल्यास धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, प्रत्यक्षात याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कोल्हार-घोटी हा महत्त्वाचा राज्य मार्ग असून या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे रस्त्याचे काम कितीही आवश्यक असले तरी कामाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, अशी मागणी जोर धरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने समनापूर-वडगाव पान परिसरातील रस्त्याच्या कामाची पाहणी करून ठेकेदाराकडून धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना राबवल्या जात आहेत की नाही, याची तपासणी करावी. नियमित पाणी मारणे, रस्त्यावरील मातीचे व्यवस्थापन, वाहतुकीसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे आणि कामाचा वेग वाढविण्याबाबत संबंधितांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

रस्त्याचे काम रखडल्यामुळे नागरिकांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच पादचारी आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष परिस्थितीची दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात.

धुळीचा त्रास तातडीने कमी केला नाही आणि रस्त्याच्या कामाला गती दिली नाही, तर परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. रस्त्याचे काम लवकर पूर्ण करावे आणि तोपर्यंत नागरिकांच्या जीवितासह आरोग्याची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# दानशूरतेतून समाजसेवेचा आदर्श उभा करणारे डॉ. नानजीभाई ठक्कर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही कष्ट, प्रामाणिकपणा आणि जिद्दीच्या जोरावर उद्योगविश्वात स्वतःचे स्थान निर्माण करून मिळविलेली संपत्ती समाजातील गरजू, वंचित आणि सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी खर्च करणारे डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर हे दानशूरतेचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहेत. शिक्षण, आरोग्य, धार्मिक स्थळे, सामाजिक संस्था तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांना त्यांनी सातत्याने मदतीचा हात दिला आहे.

मुंबईजवळील ठाणे येथे कार्यरत असलेल्या नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला ट्रस्टच्या माध्यमातून गरजू रुग्णांना उपचारासाठी मदत केली जाते. काही रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रियांचा खर्च तसेच रुग्णासोबत राहणाऱ्या एका व्यक्तीच्या निवास व भोजनाचीही व्यवस्था ट्रस्टकडून केली जाते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या अनेक कुटुंबांसाठी हा ट्रस्ट आधार ठरत आहे.



नानजीभाई ठक्कर यांचा गौरव करताना प्राचार्य श्रीकांत माघाडे, अन्वरभाई शेख व प्रणितताई माघाडे

सह्याद्री संस्थेच्या कुरण येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात उर्दू हायस्कूलच्या नवीन इमारतीसाठी मदतीच्या अपेक्षेने संस्थेच्या प्रतिनिधींनी डॉ. नानजीभाई ठक्कर यांची भेट घेतली. शाळेची माहिती, प्रस्ताव व छायाचित्रे पाहिल्यानंतर त्यांनी शाळेतील दोन वर्गखोल्या, पॅसेज, गॅलरी, प्रवेशद्वाराजवळील पोर्च तसेच शालेय पोषण आहाराच्या खोलीसाठी फरशीचे काम करण्यास तातडीने मदत देण्यास मान्यता दिली. संबंधित फाईलवर तत्काळ स्वाक्षरी करून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना कामाची कार्यवाही करण्याच्या सूचनाही दिल्या. अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत माघाडे यांनी दिली.

या भेटीदरम्यान नानजीभाईंच्या जीवनप्रवासाचा आणि सामाजिक कार्याचा परिचय झाला. त्यांच्या मते, 'दानधर्माला कोणताही धर्म नसतो. सर्वांचा ईश्वर एकच असून आपण सर्व त्याचीच लेकरे आहोत.' या विचारातून त्यांचे सर्वधर्मसमभावाचे कार्य स्पष्ट होते. मंदिर, मशीद, चर्च, शैक्षणिक संस्था किंवा सामाजिक संकुल-गरज आणि समाजहित लक्षात घेऊन मदत करण्याची त्यांची भूमिका राहिली आहे.

आजपर्यंत देशभरातील अनेक शाळा, महाविद्यालये, धर्मशाळा, धार्मिक स्थळे आणि सामाजिक संस्थांना त्यांनी मदत केल्याचे सांगितले जाते. त्यांच्या मदतीचा लाभ घेतलेल्या इमारतींची संख्या पाच हजारांहून अधिक असल्याचा दावा त्यांच्या कार्यकर्त्यांकडून केला जातो. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थांच्या उभारणीला हातभार लावला. त्यामुळे समाजात त्यांना 'शिक्षणमहर्षी', 'दानशूर', 'धर्मात्मा', 'समाजरत्न' आणि 'उद्योगरत्न' अशा विविध सन्मानांनी संबोधले जाते. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत विविध संस्थांकडून त्यांचा गौरव करण्यात आला असून डॉक्टरेटसह विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत. 'एन. के. टी. चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून देशातील विविध भागांत तसेच परदेशातही समाजोपयोगी कार्य सुरू असल्याचे नमूद केले जाते. अमेरिकेतील न्यू जर्सी येथेही त्यांच्या संस्थेचे कार्य असल्याचे सांगण्यात आले आहे. स्वतःच्या कष्टातून निर्माण केलेली संपत्ती समाजातील गरजूंसाठी खर्च करण्याचा त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# ज्येष्ठ नागरिक : अनुभवाची संपदा, समाजाचा आधार !

१ आक्टोबर, जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन. आज जगात तसेच आपल्या देशात जेष्ठ नागरिकांची संख्या खूपच मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ६० वर्षांवरील व्यक्तींना जेष्ठ नागरिक म्हणून ओळखले जाते. अलिकडच्या अधिकृत माहितीनुसार आपल्या देशात ११ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या जेष्ठ नागरिकांची असून २०५० पर्यंत हे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे.



जेष्ठ नागरिकांचे संख्येत लक्षणीय वाढ होण्याची कारणेही विशेष आहेत. गेल्या ६०/७० वर्षात भारतातील मृत्यूदर ( Mortality ) हा सतत वाढता आहे १९३० सालाचे दरम्यान आपल्याकडील मृत्यूदर ४६ होता तो आता ७५ पर्यंत पोहोचला आहे. याचाच अर्थ अलिकडे लोकांचे आयुर्मान वाढते आहे. खरंतर आज सर्वांनाच पूर्वीसारखे सकस अन्न, भेसळमुक्त दुध, शुद्ध पाणी यांचा पूर्णतः अभाव आहे. त्याचप्रमाणे सर्वत्र प्रदुषित हवामान असुनही लोकांचं आयुर्मान सतत वाढते आहे...

याला पहिले मुख्य कारण म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने झालेली प्रचंड प्रगती. सर्व आजारांवर उपचारांची उपलब्धता याशिवाय अवयव प्रत्यारोपण तसेच सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियामधील नवनवीन शोध या बाबींमुळे आयुर्मान वृद्धी वाढत चालली आहे. त्याचप्रमाणे लोकांमध्ये निकोप आरोग्याविषयी झालेली जागृती, त्यामुळे जीवनशैली, आहार-विहार, नियमितपणे व्यायाम तसेच योगा यामुळे जीवनमान उंचावले असून जास्त वर्षे जगण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील असतो...

जेष्ठ नागरिकांकडे शासन कर्त्यांचे लक्ष...

जेष्ठ नागरिकांच्या या वाढत्या लोकसंख्येमुळे जागतिक पातळीवर शासन कर्त्यांचे लक्ष वेधून घेतले गेले.अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्षांनी बहुतेक जेष्ठ नागरिक हे विद्याविभूषित असून विविध क्षेत्रातील कामांचा प्रचंड अनुभवांचा संचय त्यांचे ठायी असल्याचे सांगत जेष्ठ नागरिक हे प्रत्येक राष्ट्राची संपदा आहे. असे प्रतिपादन केले होते. आपल्या भारतीय संस्कृतीत तर जेष्ठ नागरिकांना कुटुंबाचा आधारस्तंभ, अनुभवाचे भांडार आणि संस्काराचे विद्यापीठ मानले जाते. याचेच दायित्व म्हणून विश्व पातळीवर ज्येष्ठांसाठी अनेक बाबतीत विचार होऊन ज्येष्ठांसाठी बरेच निर्णय घेतले गेले आहेत. ज्येष्ठांचे जीवन सुसह्य, सुरक्षित आणि सन्मानकारक बनविण्यासाठी जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्र आणि जागतिक आरोग्य संघटना यांचे माध्यमातून अनेक महत्त्वाची पाऊले उचलण्यात आली आहेत. वाढत्या आयुर्मानामुळे ज्येष्ठांच्या लोकसंखेचे व्यवस्थापन करणे आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हा या जागतिक प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे.

**जागतिक धोरणे**

**संयुक्त राष्ट्रांचे आंतरराष्ट्रीय कायदे..**

१) व्हिएन्ना येथे १९८२ साली पहिली जागतिक असेंब्ली ऑन एजिंग आयोजित करण्यात आली होती.यामध्ये जेष्ठ नागरिकांचे आरोग्य, गृहनिर्माण, उत्पन्न सुरक्षा यांसारख्या बाबींवर ६२ सिफारसींचा आराखडा तयार करण्यात आला.

**२) माद्रिद इंटरनॅशनल प्लॅन ऑफ क्शन..**

२१ व्या शतकात जेष्ठ नागरिकांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हा एक ऐतिहासिक करार करण्यात आला.यामध्ये वृद्ध व्यक्तींना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेणे व त्यांचे आरोग्य सुधारणे त्याचप्रमाणे त्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे यावर भर देण्यात आला आहे.

**२) जागतिक आरोग्य संघटनेचे कार्य**

**१) निरोगी वृद्धत्वाचे दशक------**

संयुक्त राष्ट्रांनी २०२१ ते २०३० हे दशक निरोगी वृद्धत्वाचे दशक म्हणून घोषित केले आहे.यामध्ये प्रामुख्याने चार बाबीवर काम केले जात आहे.

**१) वयोभेदावर आधारीत भेदभाव संपवणे..**

**२) वृद्धांसाठी अनुकूल शहरे आणि समुदाय विकसित करणे.**

**३) प्राथमिक आरोग्य सेवा आणि दीर्घकालीन वृद्धांची** काळजी ( डेपस ढशीा उरीश ) प्रणाली मजबूत करणे.

**४) जागतिक जेष्ठ नागरिक दिवस (२१ऑगष्ट) ...**

अमेरिकेचे मा.अध्यक्ष रोनॉल्ड रेगन यांनी २१ ऑगस्ट हा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून पाळण्यास सुरुवात केली. अर्थात याला नंतर जागतिक मान्यता मिळाली. जेष्ठ नागरिक दिन हा ज्येष्ठांच्या समाजातील योगदानाचा गौरव करण्यासाठी साजरा केला जातो. तसेच संयुक्त राष्ट्र सभेने १४ डिसेंबर १९९० रोजी १ आक्टोबर हा जेष्ठ नागरिक दिवस म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा करण्यास सुरुवात केली.

**५) जागतिक वृद्ध छळ विरोधी जागरूकता दिन म्हणून १५ जून साजरा होऊ लागला. यामध्ये जेष्ठांसोबत होणारा मानसिक, शारीरिक तसेच आर्थिक छळ झथांबवण्यासाठी जनजागृती केली जाते आहे.**

**६) शाश्वत विकास उद्दीष्टे....**

(अ) ज्येष्ठांसाठी चांगले आरोग्य त्यांचे कल्याण यासाठी दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

(आ) असमानता कमी करणे-----

वयावर आधारित भेदभाव संपवणे.

(इ) ज्येष्ठांसाठी सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची सुलभ सुविधा तयार करणे...

महत्वाचे----

जेष्ठ नागरिकांसाठी आपले केंद्र व राज्य सरकारने केलेल्या योजना...

आपल्या देशातील जेष्ठ नागरिकांचे करीता आपले केंद्र व राज्य सरकारने अनेक महत्वाच्या, आर्थिक, आरोग्य विषयक कल्याणकारी अनेक योजना सुरू केल्या आहेत...

**१) आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना**

७० वर्षे आणि अधिक वयाच्या जेष्ठ नागरिकांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.या अंतर्गत पात्र जेष्ठ नागरिकांना ५ लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार मिळतात..

**२) अटल वयो अभ्युदय योजना**

सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे ही योजना राबविण्यात येते. ज्येष्ठांच्या सर्वांगिण कल्याणासाठी आणि त्यांचे समिवेशन सुनिश्चित करण्यासाठी यामधून कार्य केले जात आहे.

**३) जेष्ठ नागरिक बचत योजना...**

जेष्ठ नागरिकांसाठी अत्यंत कमी जोखीम असलेली ही लोकप्रिय गुंतवणूक योजना आहे. बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये या योजनेद्वारे उत्तम व्याजदर ( ८.२ % ) दिला जातो.

**४) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्ध पेन्शन योजना.**

या योजनेद्वारे दारिद्य् रेषेखालील ६० वर्षे व त्यापुढील वय असणाऱ्या ज्येष्ठांना केंद्र तसेच राज्य शासनाकडून दरमहा आर्थिक पेन्शन दिली जाते.

**५) राष्ट्रीय वयोश्री योजना..**

या योजनेद्वारे दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठांना शारीरिक सहाय्यक तसेच यंत्र सामग्री ( उदा.चष्मा, श्रवणयंत्र, वाकर इ. ) वाटप केले जाते.

**६) संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा राज्य योजना (महाराष्ट्र )..**

महाराष्ट्रात ६५ वर्षे वरील निराधार ज्येष्ठांना राज्य शासनाकडून दरमहा आर्थिक सहाय्य दिले जाते आहे. याशिवाय राज्य शासनाकडून अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**१)बँकेतील कामांसाठी, रेल्वे आरक्षण, हॉस्पिटल्समध्ये तसेच बसमध्ये ज्येष्ठांसाठी स्वतंत्र रांग आणि बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.**

**२) ज्येष्ठांसाठी एस.टी. प्रवासात ६५ वर्षांवरील व्यक्तींना तिकीटात ५० % सवलत आणि ७५ वर्षे वयाचे वरील ज्येष्ठांना मोफत प्रवास सोय केली आहे.**

**३) जेष्ठ नागरिक संघ तसेच विरंगुळा केंद्र....**

**ज्येष्ठांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे ज्येष्ठांचे आरोग्य आणि जीवन आनंदमय होण्यासाठी मोठ्या गावांमध्ये तसेच शहरांमध्ये ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. या विरंगुळा केंद्रांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून स्वतंत्र जागा, करमणूक साहित्य पुरविले जात आहे...**

वाढत्या आयुर्मानामुळे ज्येष्ठांचे जीवन सुसह्य व सुरक्षित व्हावे यासाठी जेष्ठ नागरिक हे केंद्रस्थानी ठेवून त्यांचे करीता सर्व स्तरातून सहाय्य केले जात आहे.... १ आक्टोबर, जेष्ठ नागरिक दिनानिमित्त

सर्व ज्येष्ठांना खूप खूप मनापासून शुभेच्छा.....

**नारायण शंकर भागवत**

**सांगवी, पुणे ( जेष्ठ नागरिक संघ)**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट माळवाडी (बोटा) च्या विद्यार्थ्यांची एमक्युअर फार्मास्युटिकलमध्ये निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा)- श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिटट्यूट, माळवाडी (बोटा) येथील फार्मसी महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांनी एमक्युअर फार्मास्युटिकल लिमिटेड पुणे येथे नोकरीची संधी मिळवत संस्थेच्या शैक्षणिक व प्रशिक्षण कार्याची उल्लेखनीय कामगिरी अधोरेखित केली आहे. एमक्युअर फार्मास्युटिकल लिमिटेड ही पुणे मुख्यालय असलेली भारतातील प्रमुख फार्मास्युटिकल कंपनी असून विविध उपचारक्षेत्रांसाठी औषधांची निर्मिती, विकास आणि जागतिक स्तरावर विपणन करते. संशोधन, तंत्रज्ञान, गुणवत्ता आणि नाविन्यपूर्ण आरोग्यविषयक उपाययोजनांवर कंपनीचा विशेष भर असून तिची उत्पादने ७० हून अधिक देशांमध्ये उपलब्ध आहेत.

संस्थेतील विद्यार्थी अभिषेक काळे, आदित्य एरंडे, गणेश हुलवळे, सुजल कारले आणि रोहित पावबाके या विद्यार्थ्यांची एमक्युअर फार्मास्युटिकल लिमिटेड पुणे येथे निवड झाली आहे. संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब, फार्मा इनोव्हेशन कनेक्ट, तसेच प्लेसमेंट अँड ट्रेनिंग प्रोग्रॅम्स यासारखे इंडस्ट्री ओरिएंटेड उपक्रम आणि संस्थेचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी करता आली असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ शिवाजीराव पोखरकर आणि सचिव डॉ अमित पोखरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच त्यांना उद्योगक्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. सचिन वाकचौरे यांनी संस्थेचे उद्योगाभिमुख धोरण स्पष्ट करताना नमूद केले की, विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमधील रोजगाराच्या संधी, मुलाखत कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य आणि हँड्स ऑन प्रशिक्षण दिले जाते. या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच करिअरच्या विविध संधी मिळत आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे विविध विभागाचे प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापकवर्ग, पदाधिकारी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग तसेच सर्व विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भारतरत्न सचिन तेंडुलकरांना संगमनेर भेटीचे आ. सत्यजित तांबेंकडून निमंत्रण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार तथा संगमनेर तालुका क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार सत्यजित तांबे यांनी भारतरत्न सचिन तेंडुलकर यांची भेट घेतली असून क्रिकेटसह विविध विषयावर चर्चा केली याचबरोबर संगमनेर संगमनेर मध्ये कार्यक्रमाला येण्याचे निमंत्रण दिले आहे.

संगमनेर तालुक्याचे सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी सक्रिय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर मुंबई येथे कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी भारतरत्न सचिन तेंडुलकर, मा. कर्णधार अजिंक्य रहाणे, तेज गोलंदाज झहीर खान यांच्यासह आमदार सत्यजित तांबे संगमनेर शहराच्या नगराध्यक्ष डॉ. सौ मैथिलीताई तांबे व विविध मान्यवर उपस्थित होते. भारतामध्ये क्रिकेट हा सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जात असून सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचा देव म्हणून ओळखले जात आहे. भारतीय क्रिकेटची मोठी सेवा करताना सचिन तेंडुलकर यांनी प्रत्येकाच्या हृदयात स्थान निर्माण केली असून भारत सरकारने सर्वोच्च अशा भारतरत्न पुरस्काराने गौरवले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथे मूकबधिर व मतिमंद विद्यालयासाठी सचिन तेंडुलकर यांनी आपल्या खासदार निधीतून ५० लाख रुपयांचा निधी दिला होता.

अजिंक्य रहाणे हे संगमनेरचे सुपुत्र असून संगमनेर तालुक्यातील विविध कार्यक्रमासाठी ते सातत्याने उपस्थित असतात सक्रिय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे यांना त्यांच्या क्रिकेट अकॅडमी साठी निमंत्रित केले होते. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमासाठी झहीर खान व अजिंक्य रहाणे यांच्या समवेत भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्याबरोबर आ. सत्यजित तांबे यांनी आपुलकीने गप्पा मारल्या याचबरोबर संगमनेरच्या भेटीचे निमंत्रण आ. तांबे यांनी यावेळी सचिन तेंडुलकर यांना दिले. या प्रसंगी बोलताना आमदार तांबे म्हणाले की अजिंक्य रहाणे व झहीर खान यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव क्रिकेटच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे या दोन्ही जिल्ह्याच्या सुपुत्रांचा जिल्ह्याला आणि संगमनेर तालुक्याला सदैव अभिमान आहे.

# चारा टंचाईच्या भीतीने शेतकरी हतबल, बाजार समितीच्या उलाढालीलाही फटका

युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - राज्यातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा परिणाम आता जनावरांच्या बाजारावरही स्पष्टपणे दिसू लागला आहे. चारा व पाण्याची टंचाई वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन अनेक शेतकरी जनावरे विक्रीसाठी बाजारात आणत आहेत. मात्र, खरेदीदारांची संख्या घटल्याने जनावरांच्या किमतींमध्ये सरासरी २० ते २५ टक्क्यांपर्यंत घसरण झाल्याचे चित्र आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत लोणी येथे भरणारा जनावरांचा बाजार राज्यातील महत्त्वाच्या बाजारांपैकी एक मानला जातो. या बाजारात मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र तसेच उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी जनावरे खरेदी-विक्रीसाठी येत असतात. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक भागांतील शेतकरी नवीन जनावरे खरेदी करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

चारा टंचाई आणि जनावरांच्या पालनपोषणाचा वाढता खर्च यामुळे शेतकऱ्यांनी खरेदीपेक्षा विक्रीला प्राधान्य दिले आहे. परिणामी बाजारात जनावरांचा पुरवठा वाढला असला तरी मागणी कमी झाल्याने किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, साधारणपणे आठवड्याला १० ते १२ कोटी रुपयांची उलाढाल होणाऱ्या लोणीच्या जनावरांच्या बाजारातील व्यवहारांवरही दुष्काळाचा परिणाम झाला आहे. यंदा बाजारातील उलाढाल सुमारे २ ते ३ कोटी रुपयांनी घटल्याची माहिती संबंधितांकडून देण्यात आली. दुष्काळाची तीव्रता वाढल्यास आणि चारा टंचाई अधिक गंभीर झाल्यास जनावरांच्या बाजारासह कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या महसूलावरही मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि बाजार समिती प्रशासन यांच्यातही आगामी काळाबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अमृतवाहिनी संस्थेच्या सेवकांची पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेमध्ये यावर्षी ९.५% डिव्हिडंट देण्यात आला असून वार्षिक सर्वसाधारण सभा ही अत्यंत खेळीमळीत संपन्न झाली. पतसंस्था चळवळीमध्ये संगमनेर तालुक्यात आदर्श संस्कृती निर्माण झाली असून त्यामधून नागरिकांना वेळेला खूप मदत होत असल्याचे प्रतिपादन चेअरमन प्रा. नारायण खेमनर यांनी केले आहे.

अमृतवाहिनी संस्थेच्या द्रोणागिरी हॉलमध्ये शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्हि. बी धुमाळ, व्हाईस चेअरमन सुधीर डेंगळे, संचालक डॉ भारत बोरकर, नितीन जोंधळे, अशोक वाळे, दादाभाऊ शेपाळ ,संजय कुटे, मनोज वाकचौरे ,विक्रम अभंग, श्रीमती मेघा कोकाटे, श्रीमती सुषमा शिरसागर ,सचिव भास्कर मुंगसे, आप्पासाहेब पोकळे, विकास गुंजाळ ,प्रवीण घुगे, सौ श्रद्धा हिरे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या अमृतवाहिनी शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन पतसंस्था स्थापन केली. या पतसंस्थेची ३८ वर्षांची वाटचाल ही गौरवास्पद राहिली असून या माध्यमातून कर्मचाऱ्यांना मोठी मदत झाली आहे.

तर चेअरमन नारायण खेमनर म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात ,माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या संस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेने सभासदांच्या हिताला कायम प्राधान्य दिले असून यावर्षी दिवाळी निमित्त ९.५% डिव्हिडंट देण्यात येणार आहे. पतसंस्था चळवळीमुळे संगमनेर तालुक्यातील नागरिकांना मोठी आर्थिक मदत होत असून विविध बिगर शेती पतसंस्थांमधूनही कर्मचाऱ्यांना मदत होत असते एक आदर्श संस्कृती तालुक्यात निर्माण झाली असल्याचे ते म्हणाले.

यावेळी विविध सभासदांनी आपले मनोगती व्यक्त केली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ही ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

या सभेचे नोटीस वाचन सचिव भास्कर मुंगसे यांनी केले, सूत्रसंचालन प्रवीण घुगे यांनी केले तर व्हाईस चेअरमन सुधीर डेंगळे यांनी आभार मानले यावेळी अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज ,पॉलीटेक्निक, एमबीए, बी फार्मसी, डी फार्मसी, आयटीआय, मॉडेल स्कूल, जुनियर कॉलेज, इंटरनॅशनल स्कूल ,निडो इंटरनॅशनल स्कूल, कृषी महाविद्यालय, फूड टेक्नॉलॉजी या विविध संस्थांमधील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# आठवण गांधीजींच्या दोन संगमनेर भेटींची...

१९२० साली लोकमान्य टिळक गेले आणि देशात गांधीयुग सुरू झाले. देशभर गांधीजींविषयी प्रचंड औत्सुक्य होते. लोक त्यांच्या सभांना मोठी गर्दी करायचे. संगमनेरलाही स्वातंत्र्य चळवळ जोमात सुरू होती. असहकाराची चळवळ जोर धरीत होती. महात्मा गांधींनी टिळक स्वराज्य फंडाची घोषणा केली होती. गावोगाव यासाठी ते निधी संकलित करीत होते. लोकांना स्वदेशी कपडे, स्वदेशी वस्तूंच्या वापराचे आवाहन करीत होते.

संगमनेरातल्या काकासाहेब पिंगळे, बापूसाहेब पारेगावकर, तुकाराम निऱ्हाळी, गंगाधर दळवी, मुरलीधर जयरामदास मालपाणी, जगन्नाथ दळवी, गणेश सखाराम सराफ, लालसाहेब पीरजादे, शिवनारायण नावंदर, बाबुराव ठाकूर,शंकरराव संत वकील आदी पुढारी मंडळींनी महात्मा गांधींना संगमनेरला येण्याचे निमंत्रण दिले. गांधीजींनी ते स्वीकारले. खुद्द गांधीजी संगमनेरला येणार म्हणून संगमनेरसह आसपासच्या गावात चैतन्य पसरले. अखेरीस २१ मे १९२१ रोजी भुसावळची सभा संपवून गांधीजी संध्याकाळी नाशिकला आले आणि तिथून थेट ते संगमनेरला आले. सोबत महादेवभाई देसाई हे देखील होते. आज त्यावेळचा इतिहास वाचताना आश्चर्य वाटते. गांधीजींची मुक्कामाची व्यवस्था सोमेश्वर मंदिरात करण्यात आली होती. यामागचे नेमके कारण कळायला आज तरी मार्ग नाही मात्र गांधीजींचाच कुणाच्याही घरी थांबण्याला विरोध असावा म्हणून अशी सोय करण्यात आली आली असावी. गांधीजी मंदिरात थांबले. मंदिरात काही देवतांच्या छोट्या मूर्ती होत्या त्यातील एका मूर्तीच्या अंगावर अतिशय सुंदर असे कपडे होते... गांधीजींनी ते बघितलं आणि ते चिडले... कारण मंदिरातील देवाच्या मूर्तीवर विलायती कापडाचे कपडे होते... दुसरे एक असेही कारण होते की बिगर हिंदू मंडळींना मंदिरात येऊन भेटता येणार नाही म्हणून त्यांनी मुक्कामाची जागा बदलण्याचे ठरवले. त्या रात्री ते वीरचंद श्रीचंद गुजराथी यांच्या घरी मुक्कामाला थांबले. ती जागा म्हणजे संगमनेरचा सध्याचा



गांधी चौक.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ मे रोजी नगरपालिकेच्या प्रांगणात गांधीजींच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. संगमनेरबरोबरच आसपासच्या गावातूनही मोठ्या संख्येने लोक या सभेसाठी उपस्थित होते. या सभेत चार हजार रुपयांचा निधी जमा झाला. विशेष कौतुकाची ठरलेली गोष्ट म्हणजे गांधीजींनी सभेत लोकांना टिळक स्वराज्य फंडासाठी देणगी देण्याचे आवाहन केल्यावर सभेसाठी उपस्थित असलेल्या एक गृहिणी द्वारकाबाई मोहनीराज देशपांडे यांनी आपल्या हातातील सोन्याची एक पाटली गांधीजींकडे सुपूर्द केली. १९२१ साली स्त्रियांना सासुरवाशीण म्हणून संबोधले जायचे, अशा काळात संगमनेरला एका जाहीर सभेला महिलांनी येणे आणि या सभेत घरचे काय म्हणतील याची पर्वा न करता हातातील सोन्याची पाटली काढून देणे ही खूप धाडसाची गोष्ट होती असेच म्हणावे लागेल. याच सभेत संगमनेर शहरातील नागरिकांच्यावतीने गांधीजींना तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले मानपत्र देण्यात आले. हे मानपत्र गांधीजींनी त्यांची आठवण म्हणून नगरपालिकेकडे सुपूर्द केले. महादेव शंकर शिंदे नावाच्या कारागिराने तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले हे मानपत्र सध्या नगरपालिकेकडे उपलब्ध आहे. या सभेनंतर महात्मा गांधी कोपरगाव मार्गे येवला येथे सभेसाठी रवाना झाले. संगमनेरच्या सभेचा वृत्तांत ९ जून १९२१ च्या नवजीवन या नियतकालिकात प्रसिद्ध झाला होता.

१९२७ मध्ये १६ फेब्रुवारीला गांधीजी पुन्हा एकदा संगमनेरला आले होते. त्या दिवशी त्यांनी संगमनेरचे सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व रावबहादूर गोपाळराव माधवराव परशरामी यांच्या घरी मुक्काम केला. १७ फेब्रुवारीला ते त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी अहमदनगरला (सध्याचे अहिल्यानगर) रवाना झाले.

आज २ ऑक्टोबर, गांधी जयंती... या निमित्ताने ही आठवण..



डॉ. संतोष खेडलेकर
साहित्यीक, इतिहास संशोधन मंडळ, संगमनेर
मो. ९८२२०९७८०९

# सापांविषयी अंधश्रद्धा नको, वैज्ञानिक दृष्टिकोन हवा - सचिन गिरी



राजूर - सापांविषयी समाजात असलेल्या गैरसमजुती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी वैज्ञानिक माहिती सर्वांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सर्पमित्र सचिन गिरी यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या वतीने आयोजित वन्यजीव सप्ताह २०२६ अंतर्गत श्री स्वामी समर्थ विद्यालय मवेशी झालेल्या सर्प जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा जीव असून अन्नसाखळीचा समतोल राखण्यात त्याची भूमिका आहे. उंदरांची संख्या नियंत्रित ठेवण्याचे काम साप करतात. त्यामुळे शेतीचे नुकसान कमी होण्यास मदत होते. सापाला घाबरण्याऐवजी त्याचे निसर्गातील स्थान समजून घेणे आवश्यक आहे, असे गिरी यांनी सांगितले.

साप दूध पितात, सूड घेतात किंवा माणसाला ओळखून ठेवतात, यांसारख्या समजुती चुकीच्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. साप आढळल्यास त्याला मारू नये किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सुरक्षित अंतर ठेवून प्रशिक्षित सर्पमित्रांना माहिती द्यावी. सर्पदंश झाल्यास कोणत्याही अंधश्रद्धेचा आधार न घेता तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. मंजुषा काळे यांनी केले. त्यांनी वन्यजीव सप्ताहाचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी वन्यजीवांकडे संवेदनशीलतेने पाहण्याचे आवाहन केले. यावेळी प्रेमी राहुल राऊत, वनाधिकारी दत्तात्रय पडवळ सह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय देशमुख यांनी करून दिला.

छोट्या जाहिराताठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४ ७६२०३८८२३०
dailyyuvavarta@gmail.com

## संपादकीय...

# सामान्य माणसाच्या बजेटची परीक्षा !

दसरा-दिवाळीचा सण म्हटला की घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. नवीन कपडे, फराळ, भेटवस्तू, घराची सजावट, इलेक्ट्रॉनिक वस्तू, प्रवास आणि विविध खरेदीची लगबग सुरू होते. मात्र याच सणासुदीच्या काळात सामान्य माणसाच्या खिशावरचा ताणही वाढतो. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने 'सण साजरा करायचा की बजेट सांभाळायचे?' असा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा राहतो. त्यामुळे यंदाचा सण हा आनंदाबरोबरच सामान्य कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचीही परीक्षा घेणारा ठरत आहे.

महागाई ही आता केवळ बाजारातील चर्चेचा विषय राहिलेली नाही. ती प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरापासून शाळेच्या फीपर्यंत आणि घरभाड्यापासून आरोग्याच्या खर्चापर्यंत पोहोचली आहे. अन्नधान्य, डाळी, खाद्यतेल, भाजीपाला, दूध, गॅस, पेट्रोल-डिझेल अशा रोजच्या गरजेच्या वस्तूंच्या किमतीतील बदलांचा थेट परिणाम घरगुती अर्थसंकल्पावर होतो. याशिवाय शिक्षण, आरोग्य, वाहतूक, मोबाइल, इंटरनेट आणि इतर सेवांवरील खर्चही वाढत आहे. परिणामी, महिन्याच्या सुरुवातीलाच उत्पन्नाचा मोठा भाग निश्चित खर्चात जातो आणि बचतीसाठी उरणारी रक्कम कमी होत चालली आहे. सणासुदीच्या काळात हा प्रश्न अधिक गंभीर होतो. बाजारात खरेदीचे आकर्षण वाढते. जाहिराती ग्राहकांना सतत नवनवीन वस्तू घेण्यास प्रवृत्त करतात. 'आता खरेदी करा, नंतर पैसे द्या', 'नो-कॉस्ट ईएमआय', 'मोठी सूट' अशा योजनांमुळे खरेदी सोपी वाटते; परंतु भविष्यातील उत्पन्नावर त्याचा भार पडतो. आज घेतलेला कर्जाचा निर्णय उद्याच्या घरखर्चावर परिणाम करू शकतो. त्यामुळे सणाचा आनंद कर्जाच्या ओझ्यात बदलू नये, याची काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांची आर्थिक कसरत वाढली आहे. पगार निश्चित असतो, पण खर्च निश्चित नसतो. अचानक आलेला वैद्यकीय खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, वाहनाची दुरुस्ती किंवा घरातील एखादी अनपेक्षित गरज संपूर्ण महिन्याचे गणित बिघडवू शकते. अशा परिस्थितीत बचत ही चैनीची बाब नसून आर्थिक सुरक्षेची गरज बनली आहे. मात्र वाढत्या महागाईमुळे बचत करणेही अनेकांसाठी कठीण होत आहे. महागाईचा परिणाम ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात जाणवतो. शेतकऱ्याला उत्पादनासाठी बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज आणि वाहतूक यासाठी अधिक खर्च करावा लागतो. दुसरीकडे बाजारभावाची हमी नसल्याने उत्पादन खर्च आणि मिळणारे उत्पन्न यामध्ये तफावत निर्माण होते. त्यामुळे ग्रामीण ग्राहकांची क्रयशक्ती कमी झाली तर त्याचा परिणाम स्थानिक बाजारपेठेवरही होतो. शेतकरी, कामगार, छोटे व्यापारी आणि मध्यमवर्गीय कुटुंबे ही अर्थव्यवस्थेची महत्त्वाची चाके आहेत. त्यांच्या हातात पैसा राहणे हे अर्थव्यवस्थेच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका महत्त्वाची ठरते. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ घोषणांपेक्षा प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे, साठेबाजी आणि कृत्रिम दरवाढ रोखणे, शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळवून देणे आणि रोजगाराच्या संधी वाढवणे या उपायांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. सामान्य नागरिकाचे उत्पन्न वाढले नाही आणि केवळ खर्च वाढत राहिला तर आर्थिक विकासाची आकडेवारी सामान्य माणसाच्या जीवनमानात किती उतरली, हा प्रश्न कायम राहणार आहे. याचबरोबर ग्राहकांनीही आर्थिक शिस्त स्वीकारणे गरजेचे आहे. गरज आणि इच्छा यामधील फरक समजून घेणे, सणासाठी आधीच बजेट निश्चित करणे, अनावश्यक कर्ज टाळणे, ऑफरच्या नावाखाली गरज नसलेल्या वस्तू न घेणे आणि शक्य तितकी बचत करणे आवश्यक आहे. सणाचा आनंद मोठ्या खर्चात नसतो. कुटुंबासोबत वेळ घालवणे, आप्तेष्टांना भेटणे आणि आपल्या क्षमतेनुसार सण साजरा करणे यातही मोठे समाधान आहे. आजच्या काळात आर्थिक नियोजन हे प्रत्येक कुटुंबासाठी आवश्यक झाले आहे. महिन्याचे उत्पन्न किती, अनिवार्य खर्च किती, बचत किती आणि आकस्मिक परिस्थितीसाठी किती रक्कम राखून ठेवायची, याचे नियोजन केले तर आर्थिक ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो. मुलांनाही पैशाची किंमत आणि बचतीचे महत्त्व समजावून सांगणे ही काळाची गरज आहे. सण हा आनंदाचा असतो; तो आर्थिक चिंतेचा नसावा. दसरा वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देतो. आजच्या काळात महागाई, कर्जबाजारीपणा, अनावश्यक खर्च आणि आर्थिक असुरक्षितता या संकटांवरही विवेक, नियोजन आणि शिस्तीने विजय मिळवण्याची गरज आहे. बाजारपेठेचा विस्तार आणि ग्राहकांच्या गरजा वाढणे हे विकासाचे लक्षण असले, तरी त्या विकासाचा लाभ सामान्य माणसाच्या खिशात किती पोहोचतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.

# अभियांत्रिकी दिनानिमित्त अमृतवाहिनीच्या शिरपेचात मानाचा तुरा

## ४४ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अभियांत्रिकी शिक्षणासोबतच तांत्रिक कौशल्य, संशोधनवृत्ती, नवकल्पना आणि व्यावहारिक ज्ञानाला प्रोत्साहन देणाऱ्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी दिनानिमित्त आयोजित विविध राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक व नाविन्यपूर्ण स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि तांत्रिक गुणवत्तेची पुन्हा एकदा ठळकपणे नोंद झाली आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर लोकल सेंटर यांच्या वतीने अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील २ प्राध्यापकांचा विशेष पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंजिनिअरिंग विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. व्ही. एस. गडाख यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'आऊटस्टँडिंग इंजिनीअर अवॉर्ड', तर इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. ए. ए. पठारे यांना 'प्रॉमिसिंग इंजिनीअर अवॉर्ड' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

अभियांत्रिकी दिनानिमित्त विविध अभियांत्रिकी संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तांत्रिक, अभियांत्रिकी व नाविन्यपूर्ण स्पर्धांमध्ये अमृतवाहिनीच्या ४४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला तांत्रिक ज्ञानाची जोड देत विविध स्पर्धांमध्ये प्रभावी कामगिरी केली. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी एकत्रित ५५ हजार रुपयांची रोख बक्षिसे पटकावली.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील सोनाली कांडेकर, दर्शन मालटकर, मयुरेश नारोटे, जय कडाळे, रितेश राठोड, तन्मय आव्हाळे, सूरज झोडगे, तुषार पवार, साहिल उगलमुगले, सिद्धांत शिंदे, संकेत वाबळे, दिग्विजय रोहमारे, गौरव साबळे, श्रावणी शिंदे, रिद्धी कोकणे, पूजा शिंदे, राहुल क्षीरसागर, अथर्व भावसार, विशाखा गांगुर्डे, अनिकेत गीते, वैष्णवी अंकमवार, अजय वाळुंजे, भक्ती जाधव, संस्कृती गोडसे, ईश्वरी डुकरे, सानिका गाडेकर, आर्यन देशमुख व समृद्धी दातीर यांचा समावेश आहे.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतील आदित्य नांदे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील अक्षय अभंग, सिद्धेश हारदे, यश गुंजाळ, तन्वी हासे व समृद्धी कांडेकर, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेतील विश्वजीत घुले व श्रद्धा साबळे, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंजिनिअरिंग शाखेतील पुष्कर सोनार, ईटीसी इंजिनिअरिंग शाखेतील ईश्वरी भोर, सत्यम कोलसे, अमोल तुपे व वेदांत गजाकस, तसेच एआयडीएस इंजिनिअरिंग शाखेतील साद खलिल शेख, साईप्रसाद वाघ व साक्षी राहणे यांनीही विविध स्पर्धांमध्ये आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. प्राध्यापकांचा झालेला सन्मान आणि विद्यार्थ्यांनी मिळविलेली बक्षिसे ही संस्थेच्या शैक्षणिक वातावरणाची आणि मार्गदर्शनाची पावती असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

पान १ वरून

## रेल्वे सरळ मार्गानेच...

पुणे-नाशिक रेल्वे सरळ मार्गानेच झाली पाहिजे. ही आमची ठाम भूमिका आहे. जनतेच्या मागणीकडे दुर्लक्ष करून निर्णय घेण्याचा प्रयत्न झाला, तर पुन्हा एकदा मोठे जनआंदोलन उभे केले जाईल. वेळ पडली तर मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे बंद करू; मात्र पुणे-नाशिक रेल्वेच्या सरळ मार्गाच्या मागणीवरून एक पाऊलही मागे हटणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार सत्यजित तांबे यांनी दिला. त्यामुळे या प्रश्नावर पुन्हा एकदा तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा आ. तांबे यांनी दिला आहे. त्यामुळे समितीच्या उर्वरित कालावधीत जनसुनावणी घेऊन जनतेची भूमिका जाणून घेतली जाणार का आणि पुणे-नाशिक रेल्वेच्या सरळ मार्गाबाबत शासन काय निर्णय घेणार, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# मालपाणी विद्यालयात 'कुतूहल विज्ञानाचे' उपक्रम

## ७० विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ पुस्तकांचे वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री संत गाडगेबाबा भानुप्रभाकर सेवा प्रतिष्ठान, संगमनेर व 'अग्निपंख' विज्ञान मंडळ, रु. दा. मालपाणी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयात 'कुतूहल विज्ञानाचे' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी परिचय व सत्कार करून दिला तसेच आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे असे सांगितले . .

या प्रसंगी प्रसिद्ध विज्ञानलेखक डॉ. बाळ फोंडके लिखित 'का? कसं? केव्हा? कुठे? का? किती? कोण?' या विज्ञाननिष्ठ पुस्तकांच्या संचातील ७० पुस्तके विद्यार्थ्यांना भेट देण्यात आली. तसेच मुंग्यांसाठी साखर व पक्ष्यांसाठी धान्य देण्यात आले. इस्रोच्या बालवैज्ञानिक सहलीसाठी निवड झालेल्या इयत्ता सातवीतील विद्यार्थी आराध्य रोहिदास गुंजाळ याला 'एक होता कार्व्हर' व 'श्यामची आई' ही पुस्तके तसेच स्टेशनरी साहित्य देऊन विशेष गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. के. के. देशमुख, मेजर लक्ष्मणराव ढोले, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सेवानिवृत्त प्रा. चं. का. देशमुख, मुख्याध्यापक उत्तम एरंडे व पर्यवेक्षिका रंजना पवार यांच्या हस्ते . परिचय व सत्कार केला. प्रा. चं. का. देशमुख यांनी विद्यालयातील आपले विद्यार्थी असलेल्या शिक्षकांनी प्रतिष्ठानच्या कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. 'समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो,' या निस्वार्थ भावनेतून आमच्या प्रतिष्ठानने समाजसेवेचे व्रत स्वीकारले असून, समाजहितासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. के. के. देशमुख व मेजर लक्ष्मणराव ढोले यांनी प्रतिष्ठानच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देत मदत व सेवा योग्य गरजूंपर्यंत पोहोचविण्याच्या प्रतिष्ठानच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी पर्यवेक्षिका रंजना पवार यांनी मातोश्री गं. भा. लीलाबाई नामदेवराव यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ रु. ५,१००/- प्रतिष्ठानला पुढील समाजोपयोगी कार्यासाठी देणगी दिली.

सूत्रसंचालन विज्ञान शिक्षिका सौ. श्रावणी बुकदाने यांनी केले, तर प्रियंका कोताडे यांनी आभार मानले. मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, मानसी मुळे, दीपक रहाणे आदी शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

पान १ वरून

## शेतकऱ्यांच्या...

यामुळे एखादा नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहिल्यास त्याचा समावेश करण्याची संधी मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. दौऱ्यादरम्यान आमदार अमोल खताळ यांनी सुतारवाडी, हिवरगाव पठार येथील आदिवासी शेतकरी श्री. अनिल केदार, कौठे मलकापूर येथील श्री. तान्हाजी बागुल, कुंभारवाडी येथील श्री. दत्तात्रय मोघे, जांभुळवाडी येथील श्री. तुळशिराम खेमनर आणि पिंपळगाव देपा येथील श्री. अर्जुन गांजवे यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची स्थिती जाणून घेतली. यावेळी शेतकऱ्यांनी पावसातील खंड, पाणीटंचाई, पिकांचे झालेले नुकसान तसेच शासनाकडून अपेक्षित असलेल्या मदतीबाबत आमदार खताळ यांच्याशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. या दौऱ्यावेळी तहसीलदार धीरज मांजरे, पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रविण सिनारे, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, घारगाव पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, गुलाब भोसले, रऊफ शेख, ॲड. अमित धुळगंड यांच्यासह महायुतीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते, शेतकरी तसेच महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# संगमनेर येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार



संगमनेर - प्रतिनिधी : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले साहेब हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात असताना संगमनेर येथे ब्लू पँथर ग्रुपच्या वतीने भीम योद्धा आकाश (पप्पू) भाऊ गोडगे यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी आकाश गोडगे यांनी पुष्पगुच्छ देऊन आठवले साहेबांचे स्वागत केले. याप्रसंगी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रश्न, युवकांना रोजगाराच्या संधी तसेच समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. युवकांना शिक्षण आणि रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, सामाजिक प्रश्नांवर सकारात्मक पद्धतीने काम करणे तसेच समाजातील विविध घटकांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्याबाबत यावेळी चर्चा झाली. ब्लू पँथर ग्रुपच्या सामाजिक उपक्रमांबाबतही यावेळी माहिती देण्यात आली. संगमनेर येथे झालेल्या या भेटीप्रसंगी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.


**पाहिजेत**

डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा

स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक

B & K Construction

7758009532
7028456005

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME VAJIR PIRKHAN PATHAN

TO NEW NAME VAJIRKHAN PIRKHAN PATHAN

UIDAI 577355584727

ADRESS - JORVE ROAD, AKAR COLONY, RAHEMATNAGAR, SANGAMNER - 422605

**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाउंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**

ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431









**पाहिजेत**

नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष-१/ स्त्री -१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**

अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क -
सांगळे साहेब - 9850194463 9503947084

# सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक सुरेश वराडे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - मूळचे अकोले तालुक्यातील राजूर येथील व हल्ली आळेफाटा ये थे वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक सुरेश हरिभाऊ वराडे (वय ६०) यांचे निमोनियाने निधन झाले. मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयात आज सकाळी ११ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर आळेफाटा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. वराडे यांनी त्यांच्या सेवाकाळात सोनई, राहाता, नंदूरबार, अलिबाग, विरार आणि अंबरनाथ येथे काम केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, नातू, एक भाऊ आणि दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. ते आळेफाटा येथील उद्योजक शिवम वराडे आणि अकोले येथील किडझी स्कूलचे संचालक ऋषिकेश वराडे यांचे वडील, तर अकोले येथील उद्योजक दत्तात्रय चोथवे यांचे जावई आणि रवींद्र, संदीप व सतीश चोथवे यांचे मेव्हणे होत. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

# जिल्हा बँकेसाठी एकाच दिवशी ९२ उमेदवारांचे १०० अर्ज दाखल !




अहिल्यानगर (प्रतिनिधी) - जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असून, गुरुवारी एकाच दिवशी ९२ उमेदवारांनी १०० उमेदवारी अर्ज दाखल केले. खासदार नीलेश लंके, आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार किरण लहामटे, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले आणि वैभव पिचड यांच्यासह बँकेचे माजी अध्यक्ष व संचालकांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

दरम्यान, गुरुवारी आणखी १६६ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज नेल्याने अर्जविक्रीचा आकडा ८४६ वर पोहोचला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, दि. ५ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस असल्याने अखेरच्या दिवशी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच इच्छुकांची वाढती संख्या आणि दाखल होणारे उमेदवारी अर्ज यामुळे नेत्यांसमोरील आव्हान वाढले आहे. अर्जाची मोठ्या प्रमाणावर झालेली विक्री आणि प्रत्यक्ष उमेदवारी दाखल करण्याचा वाढता वेग पाहता, बिनविरोध निवडणुकीसाठी नेत्यांना मोठी कसरत करावी लागण्याची चिन्हे आहेत.

गुरुवारी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघांत अनेक प्रमुख इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. नगर तालुक्यात बाळासाहेब हराळ, पाथर्डी तालुक्यात आमदार मोनिका राजळे व कडूचंद्र शेटे, तर अकोले तालुक्यात आमदार किरण लहामटे, शरद चौधरी, संजीवनी शिंदे, सीताराम गायकर, बाबासाहेब भोर, रावसाहेब वाकचौरे, कैलास वाकचौरे, माजी आमदार वैभव पिचड आणि विकासराव शेटे यांचा समावेश आहे. राहुरी तालुक्यात हर्ष तनपुरे, जामखेडमध्ये अमोल राळेभात व सचिन घुमरे, तर कोपरगावमध्ये संजय शिंदे व अनिल कदम यांनी अर्ज दाखल केले. कर्जत तालुक्यात चंद्रशेखर घुले, तर पारनेरमधून गीतांजली शेळके, आमदार काशिनाथ दाते आणि खासदार नीलेश लंके यांनी अर्ज दाखल केले आहेत.

शेतीपूरक व शेतमाल प्रक्रिया संस्था मतदारसंघातून राजेंद्र नागवडे, गंगाराम धुमाळ, रामदास आंब्रे, प्रकाश नाईकवाडी, सदाशिव पोखरकर, आमदार आशुतोष काळे, रावसाहेब वाकचौरे आणि अंकुश शेळके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. बिगरशेती संस्था मतदारसंघातून राजेंद्र नागवडे, बाळासाहेब नाईकवाडी, परिघा आरोटे, अविनाश कानवडे, संजय भळगट, नंदकिशोर औताडे, वसंत लोढा, सचिन देसर्डा, जनार्दन पठारे, अशोक थोरे आणि अमोल गर्जे यांच्यासह विविध इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. महिला राखीव मतदारसंघातून अनुराधा नागवडे, सुवर्णा लहामगे, संजीवनी शिंदे, सोनल गायकवाड, जयमाला सोले पाटील, रेखा नवले, मंजुषा गुंड, शैलजा लोटके आणि संगीता जयंत वाघ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. ओबीसी मतदारसंघातून अण्णासाहेब शेलार, शरद चौधरी, करण ससाणे, नितीन खेतमाळीस, अंकुश शेळके आणि कडूचंद्र शेटे यांनी अर्ज दाखल केले आहेत. अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून आमदार किरण लहामटे, तुकाराम मेंगाळ, प्रकाश सदाफुले आणि वैभव पिचड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. एनटी राखीव मतदारसंघातून सुनीता नगरे, अशोक महानवर, ऋषिकेश ढाकणे आणि अशोक थोरे यांचेही अर्ज दाखल झाल्याची माहिती देण्यात आली.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सर्वपक्षीय सहमती घडवून आणून जास्तीत जास्त जागा बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, विविध मतदारसंघांतील इच्छुकांची संख्या आणि अर्जविक्रीचा वाढता आकडा पाहता जागावाटपाचा तिढा सोडविणे नेत्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. सोमवार हा अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्या दिवशी आणखी किती उमेदवार मैदानात उतरतात आणि बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना कितपत यश मिळते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

## एसआयआरविरोधात....

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जंतर मंतर परिसरात दिल्ली पोलिसांसह आरएएफचे जवान तैनात करण्यात आले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील जवळपास ११ मेट्रो स्थानकांवरील प्रवेश व बाहेर पडण्याचे मार्ग पुढील सूचना मिळेपर्यंत बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राजधानीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

दरम्यान, मुंबईतील शिवाजी पार्क परिसरात 'कॉकरोच जनता पार्टी'च्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात येत आहे. महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तसेच एसआयआर प्रक्रियेवर आक्षेप नोंदविण्यात आले. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास दिल्लीमध्ये पुन्हा मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा अभिजीत दिपके यांनी दिला.

तसेच काँग्रेस व इंडिया आघाडीच्या वतीने देखील लवकरच याविरुद्ध देशव्यापी आंदोलन उभारण्यात येणार आहे.

एसआयआर प्रक्रियेवरून देशभरात राजकीय वाद सुरू असतानाच आता दिल्ली आणि मुंबईतील आंदोलनांमुळे हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. निवडणूक यंत्रणेची पारदर्शकता, मतदारांच्या हक्कांचे संरक्षण आणि मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाच्या प्रक्रियेवरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

# समृद्धी महामार्गावर अपघात- ७ ठार, १२ जखमी



अमरावती (वृत्तसंस्था)

अमरावती जिल्ह्याच्या धामणगावमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात नवरात्रौत्सवासाठी दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या ७ तरुणांचा मृत्यू झाला आहे, तर १८ जण जखमी झाले आहेत.

अमरावती जिल्ह्याच्या धामणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या समृद्धी महामार्गावर हा भीषण अपघात झाला. वर्ध्याच्या सिंदी मेघे येथील नवदुर्गा पूजा उत्सव समितीचे काही तरुण सदस्य शेगाव येथून दुर्गा देवीची उंच मूर्ती नवरात्रौत्सवासाठी आणण्यासाठी गेले होते. शेगाव येथून समृद्धी महामार्गाने मूर्ती घेऊन परत येत असताना मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला.शेगाव येथून बोलेरो पिकअप गाडीने देवीची मूर्ती आणली जात होती. दरम्यान, धामणगावजवळ रात्रीच्या सुमारास मागून येणाऱ्या एका कंटेनरने या बोलेरो पिकअपला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मूर्तीसोबत असणारे मंडळाचे काही सदस्य या अपघातात चिरडले गेले, तर काही जण गंभीर जखमी झाले.या दुर्घटनेत १२ जण गंभीर, तर ६ जण किरकोळ जखमी झाले असून, एकूण ७ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये घनश्याम पाटील, ओम गावंडे, सचिन बादमनवार, प्रवीण बकाने, दत्ता कुळसंगे आणि इतर दोघांचा समावेश आहे. सर्व जखमींना तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; तर काहींना पुढील उपचारासाठी वर्ध्याच्या सावंगी रुग्णालयात हलवण्यात आले असून तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# सुयोग शाह संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या निमंत्रित संचालकपदी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील प्रथितयश व्यापारी व गॅजेट हब मोबाईल शॉपीचे संचालक सुयोग दीपकजी शाह यांची संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या निमंत्रित संचालकपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल व्यापारी, व्यावसायिक तसेच मित्रपरिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सुयोग शाह हे संगमनेर शहरातील मोबाईल व इलेक्ट्रॉनिक्स व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असून गॅजेट हब च्या माध्यमातून ग्राहकांना मोबाईल व संबंधित सेवा उपलब्ध करून देत आहेत. व्यवसायासोबतच व्यापारी बांधवांशी असलेले त्यांचे सलोख्याचे संबंध आणि मनमिळावू स्वभाव यामुळे त्यांची व्यापारी क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या माध्यमातून शहरातील व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांना व्यासपीठ मिळते. अशा संस्थेच्या संचालकपदी सुयोग शाह यांची निवड झाल्याने त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा व्यापारी बांधवांना लाभ होणार आहे. व्यापारी क्षेत्रातील विविध प्रश्न, अडचणी आणि व्यावसायिक हिताच्या विषयांवर ते प्रभावीपणे योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सुयोग शाह यांच्या पुढील सामाजिक व व्यावसायिक वाटचालीसाठी व्यापारी बांधवांकडून मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल गॅजेट हब परिवारासह मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## दिनविशेष

२००९: तुर्किक कौन्सिल — अझरबैजान, कझाकस्तान, किर्गिस्तान आणि तुर्की तुर्किक कौन्सिलमध्ये सामील झाले .

१९९०: जर्मन एकता दिन — पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनीचे एकत्रीकरण झाले.

१९५२: युनायटेड किंग्डम — देश यशस्वीरित्या अण्वस्त्र शस्त्रांची चाचणी करून जगातील तिसरे परमाणु ऊर्जा सशस्त्र राष्ट्र बनले.

१९५१: कोरियन युद्ध — मेरींग सॅनची पहिली लढाई: कॉमनवेल्थ सैन्याने कम्युनिस्ट चिनी सैन्याविरूद्ध लढली.

१९४९: WERD — अमेरिकेतील पहिले कृष्णवर्णीय मालकीचे रेडिओ स्टेशन, अटलांटा येथे सुरु.

१९४२: जर्मन व्ही-२ रॉकेट — विक्रमी ८५ किमी (४६ एनएम) उंचीवर पोहोचले.

## जन्म

१९४९: जे. पी. दत्ता — चित्रपट दिग्दर्शक

१९४७: फ्रेड डेलुका — सबवे रेस्टॉरंटचे सहसंस्थापक (निधन: १४ सप्टेंबर २०१५ )

१९३८: पेड्रो पाब्लो कुझिन्स्की — पेरू देशाचे ६६वे राष्ट्राध्यक्ष

१९२५: जॉर्ज वेन — अमेरिकन पियानोवादक आणि निर्माते, न्यूपोर्ट लोक महोत्सवाचे सहस्थापना (निधन: १३ सप्टेंबर २०२१ )

१९२१: रे लिंडवॉल — ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (निधन: २३ जून १९९६ )

१९१९: जेम्स बुकॅनन — अमेरिकन अर्थतज्ञ — नोबेल पुरस्कार (निधन: ९ जानेवारी २०१३

१९१४: म. वा. धोंड — टीकाकार (निधन: ५ डिसेंबर २००७ )

१९०७: न. शे. पोहनेरकर — मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास अशी ओळख असणारे लेखक (निधन: २ सप्टेंबर १९९० )

१९०३: स्वामी रामानंद तीर्थ — भारतीय राजनीतिज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ (निधन: २२ जानेवारी १९७२ )

१९०३: टेकीं रिबूरून — तुर्की देशाचे माजी अध्यक्ष (निधन: १३ ऑक्टोबर १९९३ )

१८९०: एमिलियो पोर्टेस गिल — मेक्सिको देशाचे ४८वे अध्यक्ष (निधन: १० डिसेंबर १९७८

## मृत्यू

२०२५: टी. जे. एस. जॉर्ज — भारतीय चरित्रलेखक आणि पत्रकार (जन्म: १ मे १९२८ )

२०२५: रमेश्वर लाल डूडी — भारतीय राजकारणी, खासदार आणि राजस्थानचे आमदार (जन्म: १ जुलै १९६३ )

२०२२: पांडुरंग राऊत — भारतीय राजकारणी, गोव्याचे आमदार (जन्म: १३ जुलै १९४६ )

२०१५: जावेद इक्बाल — पाकिस्तानी तत्त्वज्ञ आणि न्यायाधीश (जन्म: ५ ऑक्टोबर १९२४ )

२०१५: मुहम्मद नवाज खान — पाकिस्तानी इतिहासकार आणि लेखक (जन्म: २३ नोव्हेंबर १९४३ )

२०१२: केदारनाथ सहानी — सिक्कीमचे राज्यपाल, दिल्लीचे महापौर (जन्म: २४ ऑक्टोबर १९२६ )

२०१२: अब्दुल हक अन्सारी — भारतीय शास्त्रज्ञ आणि विद्वान (जन्म: १ सप्टेंबर १९३१ )

२००७: रवींद्र पाटील — सलमान खान आणि त्याचा बॉडीगार्ड यांच्या विरुद्ध एफआयआर नोंदविणारे

२००७: एम. एन. विजयन — भारतीय पत्रकार, लेखक, आणि शैक्षणिक (जन्म: ८ जून १९३० )

१९९९: अकिओ मोरिटा — सोनी कार्पोरेशनचे संस्थापक (जन्म: २६ जानेवारी १९२१ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०१ ऑक्टोबर**

## युनायटेड किंग्डम — देश यशस्वीरित्या अण्वस्त्र शस्त्रांची चाचणी करून जगातील तिसरे परमाणु ऊर्जा सशस्त्र राष्ट्र बनले

३ ऑक्टोबर १९५२ हा ब्रिटनच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस ठरला. या दिवशी ब्रिटनने ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याजवळील मॉन्टे बेलो बेटांवर 'ऑपरेशन हरिकेन' अंतर्गत आपल्या पहिल्या अणुबॉम्बची यशस्वी चाचणी केली. या चाचणीमुळे ब्रिटन अण्वस्त्र विकसित करणारा जगातील तिसरा देश बनला. त्यापूर्वी अमेरिका आणि सोव्हिएत संघाने अण्वस्त्रांची निर्मिती व चाचणी केली होती.दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्ध सुरू झाले होते. अण्वस्त्रांच्या वाढत्या स्पर्धेमुळे ब्रिटनला आपल्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाली. युद्धकाळात ब्रिटिश वैज्ञानिकांनी अणुऊर्जा आणि अण्वस्त्र संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. ब्रिटनने स्वतंत्र अण्वस्त्र क्षमता विकसित करण्याचा निर्णय घेतला आणि त्यातून 'ऑपरेशन हरिकेन'चा जन्म झाला.या प्रकल्पामध्ये ब्रिटिश वैज्ञानिक, लष्करी अधिकारी आणि अभियंत्यांनी मोठ्या प्रमाणावर काम केले. अणुबॉम्बच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान, प्लुटोनियम आणि इतर संसाधने मिळवणे हे मोठे आव्हान होते. अमेरिकेकडून सुरुवातीला मिळालेल्या सहकार्यामुळे ब्रिटिश अणुकार्यक्रमाला काही प्रमाणात मदत झाली होती. मात्र, नंतर अमेरिकेने अणु तंत्रज्ञानाबाबत अधिक कठोर धोरण स्वीकारल्याने ब्रिटनने स्वतःची क्षमता विकसित करण्यावर भर दिला.मॉन्टे बेलो येथे झालेली चाचणी ही जमिनीवर किंवा हवेत करण्यात आलेली पारंपरिक अणुबॉम्ब चाचणी नव्हती. एका जहाजाच्या आतील भागात अणुबॉम्बचा स्फोट घडवून आणण्यात आला. यामागचा उद्देश शत्रूच्या जहाजामध्ये किंवा बंदरात अण्वस्त्राचा स्फोट झाल्यास त्याचा किती विनाशकारी परिणाम होऊ शकतो, हे तपासणे हा होता. या स्फोटाने ब्रिटनच्या अण्वस्त्र क्षमतेची यशस्वी चाचणी झाली.या यशामुळे ब्रिटनला आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि संरक्षण क्षेत्रात मोठे सामरिक महत्त्व प्राप्त झाले. अमेरिका आणि सोव्हिएत संघानंतर अण्वस्त्रसज्ज झाल्यामुळे ब्रिटनने स्वतःला जागतिक महासत्तांच्या पातळीवर अधिक प्रभावीपणे उभे केले. पुढील काळात ब्रिटनने अण्वस्त्र कार्यक्रमाचा विस्तार केला आणि अधिक प्रगत अण्वस्त्रे विकसित केली.या घटनेचा शीतयुद्धाच्या इतिहासावरही मोठा परिणाम झाला. अण्वस्त्रे ही केवळ युद्धाची साधने न राहता प्रतिबंधक शक्ती म्हणून वापरली जाऊ लागली. एखाद्या देशाकडे अण्वस्त्रे असल्यास त्याच्यावर थेट हल्ला करण्यापूर्वी प्रतिस्पर्धी देशाला गंभीर परिणामांचा विचार करावा लागतो, अशी सामरिक संकल्पना विकसित झाली. ब्रिटनच्या अण्वस्त्र क्षमतेमुळे पश्चिमी गटाची सामरिक ताकद वाढली.ब्रिटनच्या अण्वस्त्र कार्यक्रमाने पुढील दशकांमध्ये अणुचाचण्या, शस्त्रस्पर्धा आणि जागतिक सुरक्षेवरील चर्चेला वेग दिला. त्याचबरोबर अण्वस्त्रांच्या विनाशकारी क्षमतेमुळे त्यांचा वापर टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियंत्रण आणि निःशस्त्रीकरणाच्या प्रयत्नांनाही महत्त्व प्राप्त झाले.

## : टी. जे. एस. जॉर्ज — भारतीय चरित्रलेखक आणि पत्रकार

**पुण्यतिथी विशेष**

टी. जे. एस. जॉर्ज हे भारतीय पत्रकारिता आणि चरित्रलेखन क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव होते. त्यांचे पूर्ण नाव थायिल जेकब सोनी जॉर्ज असे होते. त्यांचा जन्म ७ मे १९२८ रोजी केरळमध्ये झाला. प्रदीर्घ आणि यशस्वी पत्रकारितेच्या कारकिर्दीत त्यांनी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय पत्रकारितेत महत्त्वाचे योगदान दिले. निर्भीड लेखन, अभ्यासपूर्ण मांडणी आणि परखड विचार यामुळे त्यांनी पत्रकारितेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.टी. जे. एस. जॉर्ज यांनी १९५० मध्ये पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. सुरुवातीला त्यांनी द फ्री प्रेस जर्नलमध्ये काम केले. त्यानंतर विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. आंतरराष्ट्रीय पत्रकारितेतही त्यांनी उल्लेखनीय काम केले. फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू या प्रसिद्ध नियतकालिकाशी ते जोडले गेले. तसेच हाँगकाँगमधून प्रकाशित होणाऱ्या 'एशियावीक' या नियतकालिकाचे ते संस्थापक संपादक होते.भारतात परतल्यानंतर त्यांनी द न्यू इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रासाठी दीर्घकाळ लेखन केले. त्यांचा 'Point of View' हा स्तंभ विशेष लोकप्रिय होता. या स्तंभातून त्यांनी भारतीय राजकारण, समाजव्यवस्था, प्रशासन, आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि सार्वजनिक जीवनातील विविध विषयांवर आपले परखड मत मांडले. त्यांच्या लेखनात विनोद, उपरोध आणि चिकित्सक दृष्टिकोन यांचा प्रभावी वापर दिसून येत असे. कोणत्याही विषयाकडे स्वतंत्रपणे पाहण्याची त्यांची शैली वाचकांना आवडत होती.पत्रकारितेबरोबरच टी. जे. एस. जॉर्ज यांनी चरित्रलेखनातही मोठे योगदान दिले. त्यांनी विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनाचा अभ्यास करून त्यांच्यावर पुस्तके लिहिली. गायिका एम. एस. सुब्बुलक्ष्मी, अभिनेत्री नर्गिस आणि पत्रकार



पोथन जोसेफ यांच्यावरील त्यांचे लेखन विशेष उल्लेखनीय आहे. तसेच सिंगापूरचे नेते ली कुआन यू आणि आशियातील राजकीय घडामोडींवरही त्यांनी लेखन केले. त्यांच्या चरित्रलेखनातून केवळ व्यक्तीचे जीवनच नव्हे, तर त्या व्यक्तीच्या काळातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचेही चित्र स्पष्ट होते.भारतीय पत्रकारितेतील त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २०११ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. पत्रकारिता क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. ते एशियन कॉलेज ऑफ जर्नालिझमशीही जोडले गेले होते आणि पत्रकारितेच्या पुढील पिढीला मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी केले.टी. जे. एस. जॉर्ज यांची पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नव्हती. समाजातील घडामोडींचे विश्लेषण करणे, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे आणि वाचकांसमोर स्वतंत्र विचार मांडणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे, असा त्यांच्या लेखनाचा मूलभूत दृष्टिकोन होता. त्यामुळेच त्यांचे लेखन अनेक दशकांनंतरही अभ्यासपूर्ण आणि महत्त्वाचे मानले जाते.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





संगमनेर मधील सुप्रसिद्ध
बेकरी केकरीचे संचालक
मा. अनुजजी देशमुख
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
शुभम देशमुख मित्र परिवार,
संगमनेर व अकोले
बेकरी केकरी मित्र परिवार, संगमनेर
परफेक्ट बेकरी, अकोले

## 'संगमनेर मर्चंटस्' ने केले वीर वैमानिक स्मित मच्छार यांचे अभिनंदन !
## १८० जीव वाचविणाऱ्या लढाऊ भारतीय सुपुत्राला मानवंदना!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दुबईहून इस्त्रायल ची राजधानी तेल अवीवकडे जाणाऱ्या विमानाचे भारतीय पायलट स्मित मच्छार यांच्यावर प्राणघातक हल्ला होऊन देखील त्यांनी जीवावर उदार होऊन विमानातील १८० लोकांचे प्राण वाचवण्याची प्रशंसनीय आणि धाडसी कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनचा ठराव संगमनेर मर्चंट बँकेने केला आहे. शहरातील अत्यंत वर्दळीच्या अशा नवीन नगर रोड भागातील बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या बाहेरील भव्य एलईडी फलकावर जाहीर अभिनंदनचा फलक झळकावल्याने तो नागरिकांच्या कौतुकाचा विषय ठरला आहे.

दुबईहून तेल अवीकडे जाणाऱ्या विमानातील को पायलटनेच पायलट स्मित यांच्यावर प्राणघातक हल्ला करून अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या ९/११ च्या विध्वंसक हल्ल्याप्रमाणे हल्ला करण्याच्या इराद्याने हालचाली सुरू केल्या होत्या. मात्र दहा वर्षांपेक्षा अधिक काळ कौशल्यपूर्ण उड्डाणाचा अनुभव गाठीशी असलेल्या स्मित यांनी त्याचा डाव ओळखला. हल्ला होऊनही त्यांनी विमानाची सूत्र आपल्या हातातून सोडली नाही. काही क्षण अत्यंत गंभीर स्थिती निर्माण झाले होती. विमानातून प्रवास करणाऱ्या १८० लोकांचे प्राण वाचवण्यासाठी त्यांनी तातडीने सुरक्षित रित्या विमान उतरविण्याची धाडसी कामगिरी करून सर्व प्रवाशांना जीवदान दिले. सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर ते सुरक्षित उतरवण्यात स्मित यांना यश आलं. पायलट स्मित हे भारतातील गुजरात येथील आहेत. जागतिक स्तरावर त्यांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आणीबाणीच्या स्थितीत विमान मोठ्या उंचीवर असताना त्यांनी प्रसंगावधान राखून केलेल्या रोमहर्षक पराक्रमी कामगिरीमुळे जगात भारतीयांची मान उंचावली आहे. त्यांच्या साहसी कामगिरीचे कितीही कौतुक केले तरी ते कमीच आहे असे बँकेने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## आ. पवारांचे रात्रभर ठिय्या आंदोलन

पुणे- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक भरती परीक्षेत उघडकीस आलेल्या पेपरफुटीच्या प्रकारामुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, या मुख्य मागणीसाठी विद्यार्थ्यांनी पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर गुरुवारी सायंकाळपासून बेमुदत ठिय्या आंदोलन पुकारले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या आंदोलनाला थेट पाठिंबा देत विद्यार्थ्यांसोबत रात्रभर पुलावरच ठिय्या दिला.

तत्पूर्वी, बुधवारी (३० सप्टेंबर) विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या मांडल्या होत्या. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सचिवाची बदली आणि अध्यक्षांची न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते.

## जयहिंद चळवळीच्या विविध उपक्रमातून महात्मा गांधींना अभिवादन

युवावार्ता ( प्रतिनिधी )

संगमनेर - सत्य व अहिंसेचा मंत्र देणारे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंती निमित्ताने जयहिंद लोकचळवळीच्या वतीने संगमनेरमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांची प्रभात फेरी निघाली, यात गांधीं भजन व देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

सकाळी यशोधन कार्यालय






येथील मैदानापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या १५७ विद्यार्थ्यांची निघालेली प्रभात फेरी नागरीकांचे लक्ष वेधून घेत होती. यानंतर संगमनेर बस स्थानक येथे महात्मा गांधीजी यांचे आवडते भजने सादर करून राष्ट्रपित्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, हिरालाल पगडाल, नामदेव गुंजाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग
जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन,
प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह,
पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा,
पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

## सुभाष हिम्मतलाल शाह यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील जुने जाणते व प्रसिद्ध वकील स्व. हिम्मतलाल शाह यांचे सुपुत्र तथा प्रिंटिंग प्रेस क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे सुभाष हिम्मतलाल शहा (वय ८७) यांचे गुरुवारी (२ ऑक्टोबर) निधन झाले. त्यांच्या निधनाने शहा परिवारासह संगमनेरच्या सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



स्व. सुभाष शहा यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात प्रिंटिंग प्रेस क्षेत्रात भरीव काम केले. कष्ट, प्रामाणिकपणा आणि शिस्तीला महत्त्व देत त्यांनी आपल्या कुटुंबाची समर्थपणे जडणघडण केली. मुलांना उत्तम शिक्षणासोबतच चांगले संस्कार देण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला. त्यांच्या संस्कारांची आणि विचारांची परंपरा पुढे नेत त्यांचे सुपुत्र समीर शहा हे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देत आहेत. श्री श्री रविशंकर विद्या मंदिरचे संचालक तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष म्हणून समीर शहा यांची सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची ओळख आहे. मयूर शहा हेदेखील त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक परंपरेला पुढे नेत आहेत. शांत, संयमी आणि प्रेमळ स्वभावाच्या सुभाष शहा यांनी आपल्या परिचितांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. स्व. सुभाष हिम्मतलाल शाह यांच्या पार्थिवावर येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील नागरिक उपस्थित होते.

दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. सुभाष हिम्मतलाल शाह यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## साकूर बसस्थानकात महिलेचे ९५ हजारांचे मंगळसूत्र लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - तालुक्यातील साकूर बसस्थानकात एका ६० वर्षीय वृद्ध महिलेची फसवणूक करून तिच्या गळ्यातील सुमारे ९५ हजार रुपये किमतीचे मणी मंगळसूत्र लंपास केल्याची घटना ३० सप्टेंबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली असून, पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. संबंधित व्यक्तींची छायाचित्रे साकूर परिसरात लावण्यात आली असून त्यांच्याबाबत माहिती मिळाल्यास घारगाव पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पो. नि. बाबासाहेब बोरसे व उपनिरीक्षक प्रवीण महाले यांनी केले.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, चिखलठाण (ता. राहुरी) येथील सोपान पोपट डोलनर हे त्यांची आई तान्हुबाई डोलनर यांना उपचारासाठी साकूर येथे घेऊन आले होते. दुपारी सुमारे १.३० वाजता त्यांनी आईला साकूर बसस्थानकात बसवले आणि स्वतः जवळील सलूनमध्ये दाढी करण्यासाठी गेले. सुमारे अर्ध्या तासाने दाढी करून ते पुन्हा बसस्थानकात आले. त्यावेळी तान्हुबाई यांनी तीन अनोळखी व्यक्ती आपल्याजवळ आल्या होत्या, त्यांनी आपल्याला भुरळ पाडून बाजूला नेले आणि त्यांच्या सांगण्यावरून आपण गळ्यातील मणी मंगळसूत्र काढून दिल्याचे मुलाला सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू । कांजीवरम । सिल्क
पैठणी । बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..

संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25